
Proceedings of ICSSR Sponsored One Day
Interdisciplinary Multilingual National Seminar on

# POLITICS, LITERATURE AND MEDIA IN INDIA

**(Book -II)**




*Chief Editors*

**Prin. Dr B M Dhoot**
ACS College, Gangakhed

**Prin. Dr R T Bedre**
SPPM, Sirsala

Late Ramesh W... College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

**ISBN: 978-93-83871-49-0**

*Politics, Literature and Media in India(Book-II)*
Editors: Dr. B.M.Dhoot & Dr. R.T.Bedre

© Editors

First Published: February 25, 2017

Printed & Published by
Dr Kalyan Gangarde
New Man Publication, Parbhani - 431401
Mob. +91 9730721393 +91 9420079975
**Email:** nmpublication@gmail.com
**Web:** www.newmanpublication.com

Typesetting and Cover Desiging: Dr. Kalyan Gangadre

Price: Rs 250/-

All rights reserved. No material may otherwise be copied, modified, published or distributed without the prior written permission of copyright owner.

**Disclaimer:** Articles in this book do not reflect the views or policies of the Editors or the Publisher. Respective authors are responsible for the originality of their views / opinions expressed in their articles / papers- **Editors/Publisher**

24. भारत में महिलाओं की स्थिति: एक अध्ययन
/प्रा. शशिकांत परळकर / 97
25. भारतीय राजनीतिक व्यवस्था में मानवाधिकार : एक अध्ययन /
प्रा. हरिभाऊ कदम /103
26. तसलीमा नसरीन के साहित्य में : स्त्री-अभिव्यक्ति का विद्रोही स्वर / डॉ.शेख
शहेनाज अहेमद / 109
27. सामाजिक संचार माध्यम / प्रा. डॉ. महावीर रामजी हाके / 112
28. जनसंचार माध्यमों का सामाजिक दायित्व / डॉ. बी. आर. नळे / 115
29. निर्वासित प्रख्यात लेखिका – तस्लीमा नसरिन
/ प्रा. डॉ. टेंगसे दिग्विजय एम. / 119
30. **वादळी नाटककार तेंडुलकर / प्रा. डॉ. आशा गिरी / 122**
31. भारतीय संविधान आणि लोकशाही प्रा. सुहास कचरूबा गायकवाड ,
प्रा.महादेव मारोती सरवदे / 126
32. परिवर्तनशील नाटककार विजय तेंडूलकर / अर्चना देशमुख / 129
33. भारतीय संविधानामध्ये बौध्द नितीमुल्ये / प्रा.महादेव सरवदे / 136
34. छ. शिवाजी : ऐतिहासिक सत्य एवं साहित्यिक विवाद / प्रा.
डॉ. बंग नरसिंगदास ओमप्रकाश / 139
35. विजय तेंडुलकर यांच्या साहित्यावरील वाद
/ प्रा.डॉ. राजकुमार किशनराव यल्लावाड / 142
36. अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि साहित्य, कला, संस्कृती /
डॉ. मनोहर सिरसाट / 146
37. विवाद के घेरों को तोड़ते नाटककार हबीब तनवीर /डॉ.संजय जाधव / 151
38. हिंदी साहित्य जगत और फिल्में / प्रा. भेंडेकर एन.एस. / 160
39. साहित्य में प्रसार मध्यमों की भुमिका / गीता मनोहरराव नागरगोजे / 166
40. डॉ.आनंद यादव यांच्या साहित्याचा अभ्यास : एक चिंतन
/ प्रा.राम मायकर / 170
41. साहित्यातील 'आनंद' हरवला /प्रा.डॉ.काळे बालासाहेब / 174
42. साहित्यिक विवाद में : संचार माध्यमों की भूमिका और रोजगार /
प्रा. डॉ. शे. रज़िया शहेनाज़ शे. अब्दुला / 178
43. विजय तेंडुलकर नावाचे वादळ / प्रा. संगीता नारायणराव मुंढे / 183
44. `ययाति` नाटक में मानवीय मुल्य
/ प्रा. प्रकाश गायकवाड, डॉ. मिर्झा असद बेग / 187

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Tq.Sonpeth Dist.Parbhani

41.

# साहित्यातील 'आनंद' हरवला

प्रा.डॉ.काळे बालासाहेब पुंजाभाऊ
मराठी विभाग, प्रमुख
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय,सोनपेठ

थोर साहित्यिक आनंद यादव यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने मराठी साहित्यात फार मोठी पोकळी निर्माण झाली. त्यामुळे मराठी साहित्यातील 'आनंद' हरवला. वैविध्यपूर्ण आणि कसदार साहित्यनिर्मिती करणारे मराठीत फार थोडे लेखक आहेत. त्यात आनंद यादव यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. कविता, कथा, कादंबरी ,नाट्य, समीक्षा इत्यादी साहित्यप्रकारात त्यांनी लक्षणीय स्वरुपाचे लेखन केले. आधुनिक ग्रामीण साहित्याची चळवळ सुरु करून, स्वत: नवनव्या उत्तमोत्तम कलाकृती सादर करुन आणि नव्या ग्रामीण लेखकांना लिहत करुन त्यांनी प्रस्थापितांच्या सिंहासनांना अव्हान दिले. त्यांनी चालविलेल्या ग्रामीण साहित्य चळवळीमुळे डॉ. गं.ना. जोगळेकर म्हणतात त्याप्रमाणे, 'मराठी साहित्यात नवा' 'यादवकाल' सुरु करण्याचे श्रेय त्यांना आपणास दयावेतच लागते.त्यांनी जवळच्या हिरिरीने ग्रामीण साहित्य चळवळीचा पाठपुरावा केला, तेवढ्याच हिरिरीने त्यांनी या चळवळीवर झालेले हल्ले परतवून लावले. आपल्या अवतीभोवती जो विराट बहुजन ग्रामीण समाज पसरला आहे, त्याचे जीवन रेखाटन्यासाठी आपली लेखणी झिजवली पाहिजे ही त्यांची तळमळ होती. या तळमळी पोटीच त्यांनी लेखन केले. त्यामुळेच 'यादवांच्या रुपाने ग्रामीण साहित्याला चांगला 'भाष्यकार' मिळाला आहे,' असे गो.म. कुलकर्णी यांनी म्हटले आहे आणि ते योग्यच आहे.

त्यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथे शेतीवर 'कुळ' म्हणून राबणाऱ्या एका शेतकरी कुटूंबात झाला अज्ञान आणि दारिद्र्याच्या भीषण गर्तेतून बाहेर पडण्यासाठी त्यांचा शिक्षणाकडे जबरदस्त ओढा होता. लहानपणापासून शिक्षणासाठी त्यांनी ज्या हालअपेष्टा सोसल्या त्यांचे विस्तृत वर्णन त्यांच्या 'झोंबी' या आत्मचारित्रात्मक कांदबरीत आले आहे. आपल्यासारखेच कुणब्यांचे काम करावे कशी त्यांच्या वडीलांची धारण होती. त्यामुळे ते त्यांना शेतीच्या कामात इतके जखडून टाकत की, त्यांना शाळेसाठी आणि अभ्यासासाठी वेळच मिळू नये. शेतीतले ढोरकष्ट उपसत त्यांनी आपले शालेय शिक्षण पूर्ण केले. पुढील शिक्षणासाठी त्यांनी पळुन जाऊन कोल्हापूर गाठले. प्रसंगी केळीच्या साली खाऊन त्यांनी दिवस काढले. परंतु शिक्षणावरची निष्ठा ढळु दिली नाही. आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी बाल- वाचनालय चालवले. शिकवण्या ही घेतल्या. कोल्हापूरातुन बी.ए.ची पदवी संपादन केल्यावर उच्चशिक्षणासाठी ते पुणे येथे गेले. अकाशवाणी केंद्रावर नोकरी

करतांना केंद्रावर व्यंकटेश माडगुळकर, शंकर पाटील, बा.भ. बोरकर यांचे सहकारी म्हणून कार्य करण्याची संधी त्यांना लाभली. त्यांच्या सहवासात त्यांना बरेच काही शिकायला मिळाले. एम. ए. झाल्यावर इतर कुठलीही नोकरी न करता, प्राध्यापकाचा पेशा त्यांनी स्वीकारला. पुण्यासारख्या शहरात ते स्थिर झाले असले तरी आपली जीवनजाणीव ज्या भूमीत पोसली गेली त्या मातीला ते कधी विसरले नाहीत.

ग्रामीण जीवनाचे वास्तवपूर्ण चित्र मांडण्यासाठी त्यांनी आपल्या लेखनास प्रारंभ केला. १९५० ते १९६० या काळात प्रसिध्द झालेल्या ग्रामीण साहित्यातुन खरे ग्रामजीवन चित्रित झालेले नाही ही त्यांची प्रमाणिक धारणा होती. 'खळाळ', 'डवरणी', 'उखडलेली झाडे', 'मातीखालची माती', 'झाडवाटा', 'उगवती मनें', 'आदिताल' इ. विविध कथासंग्रहातुन त्यांनी बदलते ग्रामीण वास्तव चित्रित केले आहे. त्या काळातल्या ग्रामीण कथेत प्रदर्शनात्मकता आणि परिचायत्मकता हे दोष ठळकपणे दिसत होते. त्याच बरोबर लेखकाचे निवेदन प्रमाण मराठीतून आणि पात्रांचे संवाद ग्रामीण बोलीतुन, या स्वरुपात ग्रामीण कथा लिहीली जात होती. शंकर पाटलांनी आपल्या अनेक कथांतुन पात्रांच्या भावभावना त्यांच्या ग्रामीण बोलीतुन केल्या होत्या ; परंतु त्यांची निवेदनपध्दती प्रधान्याने प्रमाण मराठीच होती परंतु आनंद यादव यांनी पात्रांनाच बोलायला लावले. येथे लेखकाची भाषा आणि पात्रांची भाषा असा वेगळेपणा उरलाच नाही. वर्णनाचा पसारा टाळल्यामुळे त्यांची कथा अधिक लघू झाली. त्यांची कथा घटनेत रमण्याऐवजी माणसाच्या अंतरंगात शिरु पाहते. सामान्य ग्रामीण माणसाचे सुखदु:ख हा तिचा जिव्हाळ्याचा विषय त्या माणसाच्या सुखदु:खाला ती त्याच्याच भाषेतुन अविष्कृत करु पाहते. याच अर्थाने त्यांची कथा माडगूळकर आणि शंकर पाटील यांच्या कथेचा विकास ठरते.

आनंद यादव यांचे कांदबरी लेखनही सशक्त आणि समृद्ध आहे. कथा किंवा कविता हे अविष्कारमाध्यम पुरेसे नाही, हे लक्षात आल्यावर अनुभवद्रव्याची मागणी लक्षात घेऊन आपण कादंबरीलेखाकडे वळलो, असे त्यांनी म्हटले आहे. त्यांच्या एकलकोंड्या, गोतावळा, झोंबी, नांगरणी , घरभिंती , काचवेल, माऊली, नटरंग, इ. कादंबऱ्या प्रसिध्दआहेत. शिक्षण घेऊन बेकारीच्या खाईत पडलेल्या एका ग्रामीण तरुणाची ससेहोलपट एकलकोंड्या या कादंबरीत येते. तर तमाशाच्या ध्यासापायी जीवन बेचीराख झालेल्या गुणा या तमाशा कलावंताच्या जीवनाची शोकांतिका 'नटरंग' मध्ये येते. 'नाच्याच्या उद्ध्वस्त जीवनाचे आर्थ' या शब्दांत वि. शं. पारगावकरांनी या कादंबरीचे वर्णन केले आहे. 'झोंबी', 'नागंरणी', 'घरभिती' या त्यांच्या आत्मचरित्रात्मक कादंबऱ्या आहेत. साधारणत: एस.एस. सी पर्यंतचा काळ 'झोंबी' मध्ये आला असुन, त्यानंतरचा एम.ए. शिक्षणापर्यंतचा काळ 'नांगरणी' त येतो. तर प्राध्यापक झाल्यापासून पुढील अठरा वर्षाचा कालखंड 'घरभिंती'त रेखाटला जातो. या काळात यादवांनी आपला गावाकडील घर उभं करण्याचा जो प्रयत्न केला.त्याच संघर्षमय चित्रण यात येत. त्यात ते म्हणतात, ' हे घर उभं करतांनाआम्हा

सर्व भावंडांची, आई - दादाची जी वाताहत झाली, परिस्थितीच्या वावटळात जी पडझड झाली, तिला साकार करण्याची धडपड 'घरधिंती'त साधावलेली आहे. [illegible] या पडझडीत भारतीय जनसामान्यांचा सनातन आणि भीषण जीवनसंघर्ष दिसतो आहे " आशयाच्या आणि अविष्काराच्या नव्या वाटा चोखाळणाऱ्या ग्रामीण कादंबरीला त्यांनी सराळ व समदृध बनवले.

आनंद यादव यांची ग्रामीण कविताही प्रसिध्द आहे. त्यांनी आपल्या लेखनाची सुरुवात मुळी कवितेने केली. त्यांच्या काळात नारायण सुर्वे, रामचंद्र मुक्तिबोध, विंदा करंदीकर सारखे कवी दर्जेदार काव्यलेखन करत होते. परंतु आनंद यादव हेच एकमेव कवी होते की ग्रामीण जीवनानुभूती व्यक्त करणाऱ्या कविता लिहत होते. 'हिरवे जग' हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह. 'हिरवे जग' नंतर त्यांनी लिहिलेली कविता १९७८ मध्ये 'हिरवे जग' सह 'मळ्याची माती' या कविता संग्रहात संकलीत झाली. रात्रंदिवस शेतात राबणारा शेतकरी, त्याच्या बरोबरीने कष्ट उपसणारी त्याची धरधनीण, त्याच्या कुटूंबातील इतर माणसे, त्यांचे भावविश्व हा या कवितेचा विषय आहे. त्या शेतकऱ्यांची भाषा आणि या कवितेची भाषा वेगळी नाही. आधुनिक मराठी कवितेत या कवितेचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे. या संदर्भात जहागीदार म्हणतात, "मळ्याची माती मधील आनंद यादवांची कविता हा मराठी साहित्यातील ग्रामीण संवेदनशीलतेच्या कविता या प्रकारातील अविष्कारांमधला एक मैलाचा दगड आहे. "

आनंद यादव यांच्यापासून प्रेरणा घेऊन लेखन करणारे पुढे अनेक कवी झाले. ना.धों. महानोर, विठ्ठल वाघ, इंद्रजित भालेराव, सदानंद देशमुख, शंकर वाडेवाले या कवींसाठी भुमी निर्माण करण्याचे कार्य आनंद यादवांच्या कवितेने केले.

आनंद यादव यांचे सामीक्षालेखन सैध्दांतिक आणि उपयोजित अशा दोन्ही स्वरुपांचे आहे. स्वतःचे लेखन सुरु झाल्यापासुन ते ग्रामीण साहित्याची चळवळ सुरु होईपर्यंत आणि आणि त्यानंतरही साहित्य व्यवहाराशी निगडीत असलेल्या अनेक प्रश्नांना यादवांना सामोरे जावे लागले. या प्रश्नांविषयी वेळोवेळी झालेल्या चिंतनातून हे समीक्षालेखन झाले आहे. 'ग्रामीण साहित्याच्या वैचारिक बैठकीचे व प्रेमेयाचे पायाभुत स्वरुप समजून देण्याच्या ध्यासातुन हे सगळे लेखन झाले आहे' असे त्यांनी म्हटले आहे. ग्रामीण साहित्याचा आपण ज्या गाभीर्याने विचार करतो, त्या गांभीयाने त्याचे आक्षेपक त्याचा विचार करीत नाहीत, म्हणून आपली भूमिका त्यांना पटवून दिली पाहीजे, या प्रधान हेतूने ते समीक्षालेखनाकडे वळले. 'ग्रामीण साहित्य: स्वरुप आणि समीक्षा' हा ग्रंथ त्यादृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. या ग्रंथाच्या प्रस्तावनेत प्रा. गो..म. कुलकर्णी म्हणतात "ग्रामीण साहित्याची विस्तृत चर्चा करणारा हा मराठीतील आजवरचा तरी एकमेव ग्रंथ आहे." ग्रामीण साहित्याचे स्वरुप, प्रयोजने, प्रेरणा व ग्रामीण साहित्याचा आजपर्यंतचा प्रवासाचा शोध त्यांनी या ग्रंथात घेतला आहे. तसेच या साहित्याने कोणते सामाजिक व सांस्कृतिक प्रश्न उपस्थित

केले आहेत या विषयीची चर्चा केली आहे . तसेच ग्रामीण साहित्याची ऐतिहासिक दृष्टीने मीमांसा करताना परखड भाष्ये केली आहेत.

पहिली मराठी ग्रामीण कादंबरी : पिराजी पाटील, पहिले मराठी ग्रामीण कादंबरीकरण र. वा. दिघे तर पहिली मराठी ग्रामीण कवयित्री बहिणाबाई चौधरी हे त्यांनी साधार सिध्द केले. तसेच व्यापक मराठी समाजाची संवेदना प्रथम जोतीराव फुले यांनीच आपल्या साहित्यातून जागविली म्हणून ते आधुनिक मराठी साहित्याचे जनक ठरतात, असे सांगून त्यांच्या साहित्याचे मोठेपण त्यांनी सांगितले. साहित्याची निर्मितीप्रक्रिया अलौकिक नसून, तीत लौकिकतेचे घटक बऱ्याच प्रमाणात मिसळलेले असतात हे त्यांनी नवोदित ग्रामीण लेखकांना सांगितले. साहित्य आणि समाज यांच्यातील अन्योन्य संबंध ते कधीही नजरेआड होऊ देत नाहीत. कला ही सामाजिक वस्तु असल्याने ग्रामीण साहित्याने सामाजिक वास्तवाचे भान ठेवलेच पाहिजे, अशी ठाम भूमिका घेऊन जीवनाच्या प्रत्यक्ष अनुभवाशिवाय सकस ग्रामीण साहित्य निर्माण होऊ शकणार नाही असे ही ते नवोदित लेखकांना सांगतात.

थोडक्यात ललित साहित्याचा विचार करता, कविता, कथा, कादंबरी, लालिगद्य आणि आत्मचारित्रात्मक कादंबरी या क्रमाने त्यांची वाङमयीन वाटचाल झ ाली आहे. कोणताही वाड्यमप्रकार केवळ चुष म्हणून त्यांनी हाताळला नाही तर त्या मागे आविष्काराची अपरिहायेर्ता होती. लालितलेखन करीत, असतानाच साहित्य व्यवहाराशी निगडीत असलेल्या अनेक प्रश्नांचे चिंतन ते करीत होते. त्यातुन त्यांचे समीक्षालेखन निर्माण झाले. ग्रामीण साहित्य चळवळीला त्यांनी फार मोठे वैचारिक पाठबळ दिले. त्यांच्या कार्याची महती सांगताना डॉ. रविंद्र ठाकुर म्हणतात, "एका समान्य शेतमजुराच्या घरात जन्मलेल्या शिक्षण आणि विदग्धसाहित्य यांची कुठलिही पुर्वपरंपरा न लाभलेल्या एका व्यक्तीने मारलेली ही मजल स्तिमित करते. एका अर्थाने, जिद्य आणि अथक परिश्रम या बळावर माणुस किती उत्तंगु शिखर गाठु शकतो, यायाचाच हा वस्तुपाठ आहे."

**संदर्भ :-**


१) आनंद यादव : व्यक्ती आणि वाङ्मय - रविंद्र ठाकुर.
२) साहित्यक आनंद यादव - रविंद्र ठाकुर.
३) ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि समस्या - आनंद यादव
४) साहित्याची निर्मिती प्रक्रिया - आनंद यादव.
५) मराठी ग्रामीण कादंबरी - रविंद्र ठाकुर.


□□□

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani